गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी–गोवा

वार्तापत्र

**गोव्याला भांगराळे गोंय बनविण्यासाठी एकत्र येऊया–मुख्यमंत्री डॉ. सावंत**

ता. 18 जून 2019

28 ज्येष्ठ 1941

गोवा राज्याने मुक्तीनंतरच्या काळात सामाजिक–आर्थिक क्षेत्रात भरीव विकास करून गोवा गतिमान आणि प्रगतीशील राज्य म्हणून पुढे आले आहे. गोवा राज्याने विविध क्षेत्रात आवश्यक सेवा सुविधा निर्माण करून राज्याला विकासाच्या शिखरावर नेले आहे. गोवा भांगराळे गोंय बनविण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी पुढे सांगितले.

पणजीतील आझाद मैदानावरील राज्य पातळीवरील गोवा क्रांतीदिन कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण सुवर्ण गोवा बनविण्यासाठी सरकारच्या उपक्रमाना सहकार्य देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी लोकांना केले.

डॉ. सावंत यांनी सरकारने गोव्याला प्लास्टीक आणि कचरामुक्त करण्यासाठी हल्लीच हरित गोवा, स्वच्छ गोवा कार्यक्रमाचा शुभारंभ केल्याचे सांगून वेर्णा, काकोडा आणि राज्यातील इतर ठिकाणच्या कचरा प्रक्रिया प्रकल्पात कचरा समस्या सोडविण्यात येणार असल्याचे सांगितले. एकदा हे कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू झाले की गोवा हे देशातील अशी सुविधा असलेले पहिले राज्य ठरेल असे ते म्हणाले.

स्वच्छता हा आपल्या जीवनाचा एक भाग असून लोकसहभागाने प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी सरकार प्रयत्न करील असे मुख्यमंत्री म्हणाले. आपला सभोवताल स्वच्छ ठेवणे ही आपली नागरी जबाबदारी असल्याचे सांगून त्यांनी प्रत्येकांना या कामी स्वतः समर्पित होण्याचा सल्ला दिला.

मुख्यमंत्र्यानी गोवा मुक्त करण्यासाठी जसे स्वातंत्र्य सैनिकांनी चळवळ सुरू केली. तसेच विकासातील प्रत्येक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी सरकारच्या उपक्रमांना सहकार्य देण्याचा सल्ला गोमंतकीयांना दिला. सामान्य लोकांच्या फायद्यासाठी सरकारने आर्थिकदृष्टया दुर्बल घटक विधेयक आणल्याचे ते म्हणाले.

बेरोजगारीसंदर्भात बोलताना डॉ. सावंत यांनी कौशल्य विकास मंत्रालयाखाली रोजगार कौशल्य उपलब्ध करणारे वर्ग अभ्यासक्रमात सुरू करण्यास सरकार प्रयत्न करीत असल्याचे

सांगितले. त्यामुळे आपल्या युवकांना आपला स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यास आणि रोजगार निर्माण करण्यास किंवा कोणत्याही उद्योगात काम करण्यास मदत होईल असे ते म्हणाले.

या सरकारने नील, हरित आणि धवल क्रांतीवर भर दिल्याचे डॉ. सावंत यांनी सांगितले. समुद्राच्या चांगल्या वापरासाठी निलक्रांती, दुग्ध उत्पादन वाढीसाठी धवल क्रांती आणि कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी हरित क्रांती.

गोव्याच्या स्वातंत्र्य लढयातील इतिहासात 18 जूनला थोर महत्व आहे असे ते म्हणाले आणि 18 जून च्या ऐतिहासिक दिनासंबंधी ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी व त्यासंबंधी जागृती निर्माण करण्यासाठी महत्वपूर्ण माहिती असलेले पत्रक शाळांना वितरीत करण्यात आल्याची त्यांनी माहिती दिली. स्वातंत्र्य चळवळीतील दुर्मिळ छायाचित्रे आणि चित्रपटाचे दालन शहरात सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना सरकारी नोक-या उपलब्ध करण्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी केलेली मागणी पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यानी आश्वासन दिले. डॉ. राम मनोहर लोहिया आणि इतर स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतीचे जतन करण्यात येणार असल्याचे त्यांनी आश्वासन दिले. श्री. मोहन रानडे यांच्या वैद्यकिय उपचारासाठी सरकारतर्फे खर्च करण्याता येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्य सैनिकांचा आदर आणि त्यांना आदरांजली वाहण्यासाठी सरकारने डॉ. राम मनोहर लोहिया, श्री. पुरूषोत्तम काकोडकर, श्री. बाळा रामा मापारी, श्री.टी.बी.कुन्हा, श्री. विश्वनाथ नारायण लवंदे आणि श्री. शाबू बबन नाईक देसाई यांच्या तसबिरी तयार केल्या असून त्या पर्वरीतील सचिवालयातील ठिकाणी लावण्यात येतील.

गोवा, दमण आणि दीव स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत पेडणेकर आणि स्वातंत्र्य सैनिक संघटनेचे अध्यक्ष श्री. पांडुरंग कुंकळ्ळेयकर यांची यावेळी भाषणे झाली.

सुरवातीस मुख्यमंत्री, गोवा विधानसभेचे सभापती, श्री. राजेश पाटणेकर, महसूलमंत्री श्री. रोहन खंवटे, मुख्य सचिव श्री. परीमल राय आणि स्वातंत्र्य सैनिकांनी स्मारकावर पुष्पचक्रे वाहून आदरांजली वाहिली.

उत्तर गोवा जिल्हाधिकारी कुमारी मेनका आयएएस, डी.एम.के.संचालक श्री. तारीक थॉमस आयएएस, आयएएस श्री. अमेय अभ्यंकर, वरीष्ठ सरकारी अधिकारी आणि स्वातंत्र्यसैनिक यावेळी उपस्थित होते.

तद्नंतर स्वातंत्र्यसैनिक आग्वाद फोर्ट येथे जमा झाले आणि वरीष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्री शामसुंदर कळंगुटकर यांच्या हस्ते तिरंगा फडकविला आणि हुतात्म्यांना आदरांजली वाहिली. स्वातंत्र्यसैनिक संघटनेचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत पेडणेकर आणि इतर स्वातंत्र्यसैनिक यावेळी उपस्थित होते.

मा/वाप/एनजी/जॉआ/रना/सुसुका/2019/344